# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २३/०९/२०२४

## प्रेसनोट

दिनांक २२ सप्टेंबर हा दिवस जागतिक नदी दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये, शालेय विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन करणे, नदी, तलाव, विहीरी प्रदुषित होणार नाहीत याबाबत दक्षता घेणे यासंदर्भात जनजागृती होणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, श्री. विकास ढाकणे, अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर, डॉ. किशोर गवस यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत यांनी चला जाणुया नदीला या अभियानाच्या ठाणे जिल्हयाच्या जलनायक तथा समन्वयक डॉ. स्नेहल दोंदे यांचे समन्वयाने दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी उल्हासनगर शहरातुन वाहणा-या नदीवरील समस्यांबाबत संबंधित विभागप्रमुखांसमवेत महापालिका मुख्यालयामध्ये बैठक घेण्यात आली. त्यानंतर उल्हासनगर शहरातुन वाहणा-या रिजन्सी अॅन्टालिया परिसरातील उल्हास नदीच्या किना-यावर नदी की पाठशाला, नदी किनारी स्वच्छता अभियान तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

उल्हास नदी किना-यावर नदी कि पाठशाला अंतर्गत दुनिचंद कलानी महाविद्यालय तसेच सेंचुरी रेयॉन शाळेतील विद्यार्थी, प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक सहभागी झाले होते. त्यांना डॉ. स्नेहल दोंदे यांनी नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन कसे करावयाचे व ते का आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन केले. सेंचुरी रेयॉन शाळेतील विद्यार्थ्यांनी प्लास्टीक पिशव्यांमुळे होणारे जलप्रदुषण रोखणे याविषयावर पथनाटय सादर केले.

सदर उपक्रमामध्ये जल प्रतिज्ञा तसेच स्वच्छता प्रतिज्ञा घेण्यात आली. सार्व. आरोगय विभागाचे स्वच्छता निरीक्षक, सफाई मुकादम तसेच सफाई कामगार यांनी नदीच्या किना-यावर साफसफाई केली. उद्यान विभागामार्फत नदीच्या किना-यालगत वृक्षारोपण करण्यात आले.

महापालिकेच्या पर्यावरण विभाग, सार्व. आरोगय विभाग तसेच उद्यान विभाग व्यतिरिक्त सर्व सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पाटबंधारे विभाग, वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे चला जाणुया नदीला या अभियानाअंतर्गत उल्हासनगर शहराकरीता नियुक्त जलप्रहरी अॅड. सरीता खानचंदानी व श्री. हरी चावला हेदेखील उपस्थित होते.

(छायाप्रकाश डोंगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम अॅनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with CamScanner